शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.१०/२०२४

| | | |
|---|---|---|
| श्री.गजानन निवृत्ती कानडे<br>मु.पो.अंबप, ता.हातकणंगले,<br>जि.कोल्हापूर | } | तक्रार अर्जदार |

विरूध्द

| | | |
|---|---|---|
| १. तात्यासाहेब कोरे इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, वारणानगर, ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर<br><br>२. श्री.वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर. | } | वि.प. |

श्री.वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचे तात्यासाहेब कोरे इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचेकडील असिस्टंट प्रोफेसर श्री. गजानन निवृत्ती कानडे यांनी दिनांक ११/१०/२०२४ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमुद तक्रार पुढीलप्रमाणे-

**तक्रारीचे स्वरूप :**

मी, सदर महाविद्यालयामध्ये, दि.०२/१०/१९८९ पासून अनेक विविध पदांवर सेवा केली आहे व सध्या सेवेत आहे. दि.०१/०१/२००९ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कडून नियमित विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक पदावर नियुक्ती झाली आहे. दि.०१/१०/२०१० पासून विद्यापीठ मान्यताप्राप्त असिस्टंट प्रोफेसर या पदावर नियुक्ती झाली असून सध्या याच पदावर कार्यरत आहे. माझ्यावर अनेकबाबतीत वारंवार अनेक अन्याय झाले आहेत. त्याबरोबर मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याची पुढील विस्तृत माहिती मी स्वतंत्र ४ पृष्ठांवर दिली आहे.

तक्रारदार यांनी अर्जासोबत जोडलेली विस्तृतची मुद्येनिहाय तक्रार समितीच्या निरीक्षणामध्ये नमूद केलेली आहे.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

तक्रारदार यांच्या तक्रारीबाबत संस्था व महाविद्यालयाने आपला मुद्येनिहाय खुलासा सादर केलेला आहे. तो समितीच्या निरीक्षणामध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

समितीची निरीक्षणे :

प्रस्तुतच्या तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांनी आर्थिक तपशीलाबाबत एकूण ११ तक्रारी नमूद केल्या असून त्याबाबत संस्था, महाविद्यालयाचा खुलासा व समितीची निरिक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

**१) जुलै २०१४ ची वार्षिक वेतनवाढीची रोखून धरलेली रक्कम -**

मा.अध्यक्ष, तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या दि.१५/०८/२०२२ च्या आदेशानुसार सदर वेतनवाढीची रक्कम फरकासह देण्याचे आदेश दिले आहेत. परंतू सदर वेतनवाढीच्या फरकाची रक्कम त्यांना प्रचलित नियमानुसार पुर्णपणे मिळालेली नाही/दिलेली नाही. त्यांना प्रत्यक्षात येणे असलेली रक्कम आणि खात्यावर पाठवलेली रक्कम यात भलतीच तूटीची तफावत/फरक आहे. ही फरक रक्कम त्यांना येणे आहे. या देय रक्कमेपोटी एक ठरावीक रक्कम त्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली. त्यांना देय होत असलेल्या/रक्कमेच्या विस्तृत तपशिलाची मागणी, मा.प्राचार्यांकडे कली आहे. परंतू तपशिल मिळाला नाही. सदर वेतनवाढीची उर्वरीत रक्कम अधिक या उर्वरित फरक रकमेची, दि.३०/०९/२०२४ पर्यंतची १२ टक्के प्रतीवर्ष व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांनी सादर केलेल्या सारांश हिशेब तक्त्यानुसार (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी मागणी केली आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या खुलाश्यामध्ये मा.अध्यक्ष तक्रार निवारण समिती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या दि.१५/०८/२०२२ च्या आदेशानुसार सदर वेतनवाढीची रक्कम फरकासह देण्याच्या आदेशानुसार सदरची पूर्ण रक्कम अदा करणेत आलेली असून सदरची रक्कम रू. २,११,९८९/- यांचे वारणा बँक खाते क्रमांक १८९७ दि.१६/१०/२०२२ रोजी जमा करणेत आलेली आहे. सदरची रक्कम मिळाली म्हणून तक्रारदारयांनी पोहोच आमचेकडे दिलेली आहे. त्याची प्रत खुलाश्यासोबत जोडलेली असल्याचे नमूद केले आहे.

तक्रारदार तसेच जाबदार यांचे म्हणणे अवलोकनी घेता समितीचे मत असे की, तक्रारदार यांनी अर्जात नमूद केलेल्या तक्रारीबाबत समितीने यापुर्वी दि.२३/०८/२०२२ रोजी आदेश दिलेले आहेत. श्री.कानडे यांनी सदर आदेशाविरूध्द मा.पीठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे अपिल दाखल करून दाद मागितली असून सदर प्रकरण मे.न्यायाधिकरण यांचेसमोर प्रलंबित असल्याचे समितीच्या निदर्शनास येते. समितीकडून एकदा निकाली झालेली तक्रार पुनश्चः या समितीसमोर सुनावणीस घेता येणार नाही. तसेच निकालाच्या अंमलबजावणीची बाब या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही. सबब, सदर नमूद तक्रारीबाबत समितीकडून कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.

२) वर्ष- २०१७ व वर्ष - २०१८ या दोन वेतनवाढीची रक्कम -

सदर वेतनवाढीच्या फरकाची होणारी रक्कम त्यांना येणे आहे. सदर वेतनवाढीच्या फरकाची होणारी रक्कम अधिक या फरक रकमेची दि. ३०-०९-२०२४ पर्यतची १२ टक्के प्रतीवर्ष व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांना सादर केलेल्या सारांश हिशेब तक्त्यानुसार (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या खुलाश्यामध्ये तक्रारदार यांचा पीबीएस तपासला असता समाधानकारक नाही असे दिसून आले आहे. यामुळे या २ वेतनवाढ देण्यात आलेल्या नाहीत. याबाबत पीबीएस सोबत जोडला आहे. तसेच संस्थेकडून जी कागदपत्रे याबाबत तयार केलेली आहेत त्यावेळची ती जोडली आहेत. सदरची कृती प्रचलित नियम व नियमावली नुसार करण्यात आलेली असल्याचे नमूद केले आहे.

सदर तक्रारीबाबत तक्रारदार तसेच जाबदार यांचे म्हणणे अवलोकनी घेता असे दिसून येते की, तक्रारदार यांच्या सन २०१७ व २०१८ या कालावधीतील वेतनवाढ रोखण्याबाबत जाबदार यांचेकडून तक्रारदार यांना कोणत्याही प्रकारे अवगत करण्यात आल्याचे किंवा त्यांना त्याबाबत नैसर्गिक न्यायतत्वानुसार आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिली गेली नसल्याचे समितीच्या निदर्शनास येते. जाबदार यांच्या म्हणण्यानुसार सदरची कृती प्रचलीत नियम व नियमानुसार करण्यात आली असल्याचे जरी म्हटले असले तरीही अशी कृती अवलंबतना ती एकतर्फी न करता याबाबत संबधितांना अवगत करून त्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. तक्रारदार यांच्या सदर वेतनवाढी रोखण्याची जाबदार यांचेकडून केलेली कार्यवाही एकतर्फी करण्यात आली असल्याचे दिसून येते. सबब, तक्रारदार यांची सदर कालावधीतील रोखलेली वेतनवाढीची रक्कम जाबदार यांनी तक्रारदार यांना आदा करावी असे समितीचे मत आहे.

३) ७ व्या वेतन आयोगानुसार दि.०१/०१/२०१६ पासून ३१/१२/२०१८ पर्यतच्या पगाराच्या फरकाची रक्कम -

या रकमेची, दि.३०/०९/२०२४ पर्यतची १२ टक्के प्रतीवर्ष व्याजदराने होणारी व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांनी सादर केलेल्या 'सारांश हिशेब तक्त्यानुसार' (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये सदर अभियांत्रिकी महाविद्यालय हे कायम विनाअनुदानित संस्था आहे. विद्यार्थ्यांच्याकडून जमा होणाऱ्या फी मधून म्हणजेच खर्चावर आधारीत शिक्षण शुल्क समितीकडून मान्यता मिळालेल्या ज्या त्या वर्षांच्या फी मधून संस्थेला आर्थिक व्यवहार करावे लागतात. त्यामुळे पूर्वलक्षी प्रभावाने सातवा वेतन आयोग लागू करणेसाठी कोणतीही आर्थिक

तरतूद नसलेमुळे आमचेकडील कोणत्याही स्टाफला सातवा वेतन आयोग लागू करणेत आलेला नाही. तसेच सातव्या वेतनानुसार कोणतेही वेतन देणेत आलेले नसल्याचे म्हटले आहे.

समितीसमोर तक्रारदार श्री.कानडे यांनी त्यांचे महाविद्यालयातील चार शिक्षकांचे मस्टर दाखविले व त्यानुसार त्यांना सातवा वेतन लागू करावा अशी मागणी केली. याबाबत जाबदार यांनी सातवा वेतन आयोग लागू केलेले शिक्षक हे सदर अभियांत्रिकी महाविद्यालयाकडील नसून ते वारणा विद्यापीठाकरिता असल्याचे मांडण्यात आले. महाविद्यालयातील अन्य शिक्षक/कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागू केल्याबाबत तक्रारदार यांनी त्यांना माहित नसल्याचे सांगितले. उपरोक्त दोन्ही पक्षांचे म्हणणे अवलोकनी घेता, ही समिती या निष्कर्षास येते की, तक्रारदार यांना सद्यस्थितीत सातवा वेतन फरक देण्याबाबतची मागणी मान्य करणे संयुक्तिक होणार नाही.

**४) सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार होणारी वेतन/पगार रक्कम -**

मासिक पगार त्यांना ०१/०१/२०१९ पासून लागु केलेला नाही. सदर ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार होणा-या वेतनाच्या/पगाराच्या फरकाची होणारी रक्कम त्यांना येणे आहे. सदर ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार होणा-या वेतनाच्या/ पगाराच्या फरकाची होणारी रक्कम अधिक या फरक रकमेची, दि.३०/०९/२०२४ पर्यंतची १२ टक्के प्रतीवर्ष व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांनी सादर केलेल्या 'सारांश हिशेब तक्त्यानुसार' (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी तक्रार नमूद केली आहे.

तक्रारदार यांच्या तक्रारीबाबत संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या खुलाश्यामध्ये सदर अभियांत्रिकी महाविद्यालय हे कायम विनाअनुदानित संस्था आहे. विद्यार्थ्यांच्याकडून जमा होणाऱ्या फी मधून म्हणजेच खर्चावर आधारीत शिक्षण शुल्क समितीकडून मान्यता मिळालेल्या ज्या त्या वर्षांच्या फी मधून संस्थेला आर्थिक व्यवहार करावे लागतात. त्यामुळे पूर्वलक्षी प्रभावाने सातवा वेतन आयोग लागू न करणेसाठी कोणतीही आर्थिक तरतूद नसलेमुळे आमचेकडील कोणत्याही स्टाफला सातवा वेतन आयोग लागू करणेत आलेला नाही. तसेच सातव्या वेतनानुसार कोणतेही वेतन देणेत आलेले नाही असे नमूद केले आहे.

जाबदार यांनी सदर अभियांत्रिकी महाविद्यालयातील कोणत्याही स्टाफला अद्याप सातवा वेतन आयोग लागू अद्याप लागू केलेला नसल्याचे म्हटले असले आहे. सबब, सद्यस्थितीत सातवा वेतन फरक देण्याबाबतची मागणी मान्य करणे संयुक्तिक होणार नाही असे या समितीचे मत झाले.

**५) फेब्रुवारी, २०२० ते डिसेंबर, २०२१ पर्यंत या २३ महिने कालावधीचा थकीत मासिक पगार रक्कम**

या २३ महिने कालावधीचा थकीत मासिक पगार बेकायदेशीररित्या पूर्णपणे रोखून धरला. कोणतेही कायदेशीर कारण नसताना/ कोणतीही पूर्व कल्पना न देता आकस्मिकत्या पगार पूर्णपणे

थांबवला. नियमीत कर्मचा-याचा असा विनाकारण पगार थांबवण्याचे हे कृत्य हा एक फारच गंभीर गुन्हा ठरत आहे. याच कालावधीत संपूर्ण जगावर कोरोना महामारीचे भयंकर संकट होते. अक्षरशः मृत्यूचे थैमान सुरू होते. प्रत्येक कुटुंबाला औषधे व वैद्यकिय सुविधेसाठी प्रत्येकाला पैशाची नितांत गरज असताना अशा आणीबाणीच्या परिस्थितीत माझा नियमीत पगार थांबवून ठेवला. याबाबत त्यांनी मा.अध्यक्षसो, तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, यांना त्यांची नियमानुसार होणारी पगार रक्कम तत्काळ मिळावी अशी विनंती दि.२८/०१/२०२२ च्या तक्रार निवारण सभेच्या प्रत्यक्ष सुनावनी वेळी केली. त्यानुसार, या थांबवून ठेवलेल्या पगाराची नियमानुसार होणारी संपूर्ण रक्कम तत्काळ त्यांच्या बँक खात्यावर पाठवण्याचे/देण्याचे सक्त आदेश, मा.अध्यक्षसो, तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ यांनी दि.२८/०१/२०२२ रोजी मा.प्राचार्यांना दिले. परंतु, मा.प्राचार्यांनी सदर सक्त आदेशाचे उल्लंघन केले. त्यामुळे त्या आदेशाचा म्हणजेच न्याय व्यवस्थेचा गंभीर अवमान झालेला आहे. कारण, त्या आदेशानुसार, संपूर्ण थकीत पगार रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा न करता, त्यांनी एक विचित्र, विसंगत, चुकीची व त्यांना येणे असलेली रक्कम आणि खात्यावर पाठवलेली रक्कम यात भलतीच तूटीची तफावत/फरक आहे. देय होत असलेल्या/रकमेच्या विस्तृत तपशिलाची मागणी, मा.प्राचार्यांकडे केली आहे. परंतू तपशील मिळाला नाही. ही फरक रक्कम त्यांना येणे आहे. त्यामुळे सदर पगाराची उर्वरीत फरकाची होणारी रक्कम अधिक या फरक रकमेची, दि.३०/०९/२०२४ पर्यंतची १२ टक्के प्रतिवर्ष व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांनी सादर कलेल्या सारांश हिशेब तक्त्यानुसार (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये - या कालावधीमध्ये संपूर्ण जगावर कोरोना महामारीचे भयंकर संकट आले होते. अचानक संपूर्ण जगामध्ये लॉकडाउन लागल्यामुळे सर्वजण आपआपल्या घरी आश्रय घेण्यासाठी निघुन गेले. सदर महाविद्यालय पूर्णतः विना अनुदानित तत्वावर सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांच्याकडून जमा होणाऱ्या फी मधून स्टाफच्या पगारावर खर्च केला जातो. या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्याकडून फी जमा झालीच नाही. विद्यार्थ्यांनी ज्या पध्दतीने फी जमा केली त्या पध्दतीने कोरोना मधील ५० टक्के प्रमाणे ज्या त्या महिन्यामध्ये सर्व स्टाफचे पगार संस्थेकडून करण्यात आले. राहिलेले ५० टक्के हे लॉकडाउन संपल्यानंतर पूर्णतः यांचे खातेमध्ये जमा केलेले आहेत. तसेच जाबदार यांनी समितीसमोर सुनावणीवेळी तक्रारदार यांच्या २३ महिन्याच्या थकीत पगाराची रक्कम रू.३,५७,३५७/- इतकी तक्रारदार यांना अदा केल्याचे बँक स्टेटमेंट सादर करण्यात आले. तक्रारदार यांनी देखील ते अमान्य केलेले नाही.

याबाबत समितीने महाविद्यालयाकडून आदा केलेले बँक स्टेटमेंट अवलोकनी घेतले. त्यामध्ये तक्रारदार यांना उपरोक्त रक्कम आदा करण्यात आली असल्याचे दिसून येते. सबब, महाविद्यालयाने

तक्रारदार यांना दिलेल्या प्रत्येक महिन्याच्या वेतनाची सॅलरी स्लिप द्यावी जेणेकरून त्यांना जमा झालेल्या वेतनाचा तपशिल अवगत होईल.

**६) जुलै - २०२१ व ऑक्टोबर - २०२१ च्या मासिक पगारातून इन्कम टॅक्स वजावट म्हणून प्रत्यक्षात वजा केलेली एक फरक रक्कम व एक पूर्ण रक्कम याचा परतावा -**

जुलै-२०२१ च्या मासीक पगारातून इन्कम टॅक्स वजावट म्हणून प्रत्यक्षात रू.९,००० वजा करून घेतले. परंतू फॉर्म नं. १६ मध्ये प्रत्यक्षात रू.७००० च इन्कम टॅक्स कार्यालयास पाठवले. त्यामुळे याचा परतावा मिळाला नाही. यापैकीची जादा उर्वरीत फरक रक्कम रू.२००० येणे आहे. तसेच ऑक्टोंबर २०२१ च्या मासिक पगारातून इन्कम टॅक्स वजावट म्हणून प्रत्यक्षात रू.१५००० इतकी रक्कम इन्कम टॅक्स वजावट म्हणून घेतली. परंतू ही रक्कम १६ नं. फार्ममध्ये दाखवली नाही. सदर रक्कम, इन्कम टॅक्स कार्यालयास पाठवली नाही. त्यामुळे याचा परतावा त्यांना मिळाला नाही. ही रक्कम रू.१५,०००/- येणे आहे. ही रक्कम (रू.२०००/- व रू.१५०००/-) अथिक या फरक रकमेची, दि.३०/०९/२०२४ पर्यंतची १२ टक्के प्रतिवर्ष व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांनी सादर कलेल्या सारांश हिशेब तक्त्यानुसार (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये - जुलै २०२१ च्या मासिक पगारातून इन्कम टॅक्सची रक्कम रू.९,०००/- वजावट करण्यात आला. परंतु यांच्या १६ नंबर फॉर्ममध्ये रू. ७,०००/- दिसत आहे. राहिलेले रू.२,०००/- व रू.१५,०००/- हे इन्कम टॅक्स पोर्टलवरती रिवाईज रिटर्न केलेले आहेत. हे त्यांच्या वैयक्तिक इन्कम टॅक्स लॉगीनवरती त्यांना त्यांचे रिवाईज रिटर्न दिसते. याबाबत त्यांना कार्यालयामध्ये बोलावून माहिती दिलेली असल्याचे नमूद केले आहे.

तक्रारदार तसेच जाबदार यांचे म्हणणे अवलोकनी घेता समितीचे मत असे की, तक्रारदार यांची रू.२,०००/- व रू.१५,०००/- ही रक्कम इन्कम टॅक्स पोर्टलवरती तक्रारदार यांच्या लॉगइनमध्ये रिवाईज रिटर्न मध्ये दिसत असल्याचे दोन्ही पक्षकारांनी मान्य केले आहे. इन्कम टॅक्स कार्यालय हे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील संस्था आहे. याबाबत समिती कोणतेही निर्देश देवू शकत नाही. तक्रारदार यांनी सदर कार्यालयाकडे याबाबत रिवाईज रिटर्न करणेबाबतची योग्य तो पाठपुरावा करावा असे समितीचे मत आहे.

**७) प्रॉव्हीडंड फंडाची थकीत रक्कम -**

तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये त्यांना दि.३१/०३/२०२३ रोजी वय वर्षे ५७ पूर्ण झाले. दि.०१/०४/२०२३ पासून ते पेन्शन मिळण्यास पात्र झाले. त्यामुळे त्यांच्या पगारातून, संस्थाप्रमुखांकडून

पाठवल्या जाणा-या भविष्य निर्वाह निधिच्या पेन्शन खातेस जाणारी रक्कम रू.१२५० थांबवून त्यांच्या प्रॉव्हीडंड फंड खात्यावर पाठवली जाणे आवश्यक होते. परंतु, त्यांच्या प्रॉव्हीडंड फंड खात्यावर पाठवली नाही. ही सदर रक्कम रू.१२५० पासबुकात दिसत नाही. ही रक्कम त्यांना येणे आहे. ही रक्कम अधिक या रकमेची दि.३०/०९/२०२४ पर्यंतची १२ टक्के व्याजदराने होणारी रक्कम त्यांनी सादर केलेल्या सारांश हिशेब तक्त्यानुसार (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये - दि. ३१/०३/२०२३ रोजी त्यांना ५८ वर्षे पूर्ण झालेले आहे. प्रोव्हीडंट फंड नियमानुसार ५८ वर्षांनंतर पेन्शन सुरू होते. यांची पेन्शनची रक्कम रू. १,२५०/- हे तीन महिने पेन्शनच्या फंडाला गेलेली आहे. सदरची रक्कम ही प्रोव्हीडंट फंडात यावी लागत होती. ती चुकून पेन्शनमध्ये जमा झालेली आहे. याबाबत तक्रारदार यांना सूचना केल्या व लागणारी कागदपत्रे देण्यास सांगितले असता अद्याप त्यांनी मागणी केलेली आवश्यक कागदपत्रे कार्यालयामध्ये जमा केलेली नाही. याबाबत फंड ऑफीस, कोल्हापूर यांच्याशी करावी लागणारी कागदपत्रे आमचेकडून पूर्ण आहेत याची प्रत सोबत जोडली आहे. त्यांची वैयक्तिक लागणारी कागदपत्रांची पूर्तता अद्याप न केल्यामुळे कागदपत्रे ही अद्याप आमचे (महाविद्यालय) कार्यालयाकडेच आहेत.

तक्रारदार तसेच जाबदार यांचे म्हणणे अवलोकनी घेता समितीचे मत असे की, तक्रारदार यांच्या प्रॉव्हीडंड फडामध्ये जमा करावी लागणारी रक्कम चुकून पेन्शनच्या फंडामध्ये गेली असल्याचे जाबदार यांनी मान्य केले आहे. तसेच याबाबत जाबदार यांनी सदर कार्यालयाकडे पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते. या कार्यालयाकडून जादा गेलेली रक्कम परत मिळणेकामी आवश्यक असणारी कार्यवाही/त्रुटीपुर्तता जाबदार यांनी तात्काळ करावी तसेच या कामी जाबदार यांना आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता तक्रारदार यांनी त्वरीत करावी व संबंधित कार्यालयाकडे पाठपुरावा करावा.

**८) मा. प्राचार्यांनी माझ्या पगारातून शिक्षण व इतर देणगीच्या नावाखाली सातत्याने माझ्या संमतीशिवाय परस्पर जबरदस्तीने रक्कम वजा केलेली रक्कम -**

तक्रारदार यांनी सदर तक्रारीमध्ये मा.प्राचार्यांनी त्यांच्या पगारातून शिक्षण व इतर देणगीच्या नावाखाली सातत्याने त्यांच्या संमतीशिवाय परस्पर जबरदस्तीने रक्कम वजा केली आहे. ही रक्कम त्यांना येणे आहे. ही रक्कम अधिक या रक्कमेची, दि.३०/०९/२०२४ पर्यंतची १२ टक्के प्रतीवर्षे व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांनी सादर केलेल्या सारांश हिशेब तक्त्यानुसार (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी तक्रार नमूद केली असून याबाबत फेब्रुवारी २०१५ ते जुलै २०२४ पर्यंतच्या कालावधीमधील रक्कमेची मागणी तपशिल दिला आहे.

सदर तक्रारीबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये तक्रारदार यांच्या पगारातून केलेली रक्कम ही त्यांच्या सहमतीने कपात केलेली आहे. ज्या त्या महिन्यामध्ये त्यांनी कपात झालेला पगार घेतलेला आहे. तसेच शिक्षण मंडळास देणगी दिलेल्या रक्कमेची पावती आयकर विवरण पत्र भरत असताना त्यास जोडून आयकरामध्ये सूटसुध्दा त्यांनी मिळविलेली आहे. त्यामुळे सदरची मागणी चुकीची आहे. सदरचा मुद्दा हा तक्रारदारयांनी दि. ०४/०५/२०१५ रोजी तक्रार अर्ज शिवाजी विद्यापीठामध्ये दिलेला होता. यामध्ये शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समितीने सदरचा मुद्दा दि. २३/०८/२०२२ रोजीच्या निकालानुसार अमान्य केलेला असल्याचे नमूद केले आहे. तसेच याबाबत तक्रारदार यांनी सदर आदेशाविरूध्द मे.न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे दाद मागितली असून ती प्रलंबित असल्याचे समितीसमोर कथन केले.

उपरोक्त तक्रारीबाबत समितीच्या असे निदर्शनास येते की, सदरची तक्रार मे.न्यायाधिकरण यांचेसमोर प्रलंबित आहे. तथापि, याबाबत तक्रारदार यांनी आपण समितीकडे यापुर्वी दाखल केलेल्या तक्रारीतील मागणी ही सन २०१५ पुर्वीची केलेली होती. आता सदर अर्जात फेब्रुवारी, २०१५ पासून पुढील कालावधीकरीताची आपण मागणी नमूद केली असल्याने ती समितीसमोर मांडली आहे असे कथन केले. समितीने दोन्ही पक्षकारांनी या तक्रारीबाबत मांडलेले लेखी व तोंडी म्हणणे अवलोकनी घेतले. तक्रारदार यांच्या दि.०४/०५/२०१५ रोजीच्या अर्जामध्ये जो मागील कालावधीचा मुद्दा होता. त्याबाबत मे.न्यायाधिकरण यांचसमोर तक्रार प्रलंबित असून मे.न्यायाधिकरण यांचेकडून त्याबाबत अंतिम निर्णय झाल्याशिवाय हया मुद्याबाबत सद्यस्थितीत तक्रार निवारण समितीकडून निर्णय देणे उचित होणार नाही.

**९) उच्च शिक्षकेय अतिरिक्त कामाचे (Additional Work) अतिरिक्त मानधन रक्कम -**

तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये दि.०१/०१/२००९ पासून त्यांची नेमणूक विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून या संस्थेतील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाकडील पदवी अभ्यासक्रमाकडे झाली. या पदाचे काम करत असताना त्यांना एम ई/ एम टेक/ सिव्हिल इंजिनिअरिंग/ सी ॲण्ड एम या उच्च पदवी अभ्यासक्रमाचा विविध स्तरावरील अतिरिक्त/जादा कामाचा अधिभार दिला आहे. या अतिरिक्त कामाच्या मानधनाची रक्कम त्यांना मिळालेली नाही. ही रक्कम त्यांना येणे आहे. ही मानधनाची रक्कम अधिक या रकमेची दि.३०/०९/२०२४ पर्यंतची १२ टक्के प्रतीवर्षे व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांनी सादर केलेल्या सारांश हिशेब तक्त्यानुसार (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी तक्रार नमूद केली असून याबाबत फेब्रुवारी २०१५ ते जुलै २०२४ पर्यंतच्या कालावधीमधील रक्कमेच्या मागणीचा तपशिल दिला आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये श्री.कानडे यांना माहे जुलै, २०११ पासून एम.ई. सिव्हील इंजिनीअरींग आणि पदवीकडील बी.ई. सिव्हील इंजिनीअरिंगकडील कार्यभाग विभाग प्रमुख यांनी

दिला होता. सदरचा एकत्रित कार्यभार हा एक शिक्षकीय कार्यभारापेक्षा जास्त नाही. तसेच टर्म वर्क असेसमेंट करणे हा शिक्षकांच्या नियमित कामांचा एक भाग आहे. त्यामुळे त्यांना वेगळे मानधन देणे लागत नाही. सदरचा मुद्दा हा तक्रारदारयांनी दि. ०४/०५/२०१५ रोजी तक्रार अर्ज शिवाजी विद्यापीठामध्ये दिलेला होता. यामध्ये शिवाजी विद्यापीठ तक्रार समितीने सदरचा मुद्दा दि. २३/०८/२०२२ रोजीच्या निकालानुसार अमान्य केलेला आहे. तसेच याबाबत तक्रारदार यांनी सदर आदेशाविरूध्द मे.न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे दाद मागितली असून ती प्रलंबित असल्याचे समितीसमोर कथन केले.

उपरोक्त तक्रारीबाबत समितीच्या असे निदर्शनास येते की, सदरची तक्रार मे.न्यायाधिकरण यांचेसमोर प्रलंबित आहे. तथापि, याबाबत तक्रारदार यांनी आपण समितीकडे यापुर्वी दाखल केलेल्या तक्रारीतील मागणी ही सन २०१५ पुर्वीची केलेली होती. आता सदर अर्जात फेब्रुवारी, २०१५ पासून पुढील कालावधीकरीताची आपण मागणी नमूद केली असल्याने ती समितीसमोर मांडली आहे असे कथन केले. समितीने दोन्ही पक्षकारांनी या तक्रारीबाबत मांडलेले लेखी व तोंडी म्हणणे अवलोकनी घेतले. तक्रारदार यांच्या दि.०४/०५/२०१५ रोजीच्या अर्जामध्ये जो मागील कालावधीचा मुद्या होता त्याचा देयाबाबत निर्णय मे.न्यायाधिकरण यांचसमोर प्रलंबित असून मे.न्यायाधिकरण यांचेकडून त्याबाबत अंतिम निर्णय झाल्याशिवाय हया मुद्याबाबत सद्यस्थितीत तक्रार निवारण समितीकडून निर्णय देणे उचित होणार नाही.

**१०) इस्टेट ऑफिस इन्चार्ज या अतिरिक्त/जादा पदाच्या कामाच्या मानधनाची रक्कम -**

तक्रारदार यांनी सदर तक्रारीमध्ये इस्टेट ऑफिस इन्चार्ज या अतिरिक्त/जादा पदाच्या कामाच्या मानधनाची त्यांना येणे आहे. ही दि.३०/०९/२०२४ पर्यंतची १२ टक्के प्रतीवर्षे व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांनी सादर केलेल्या सारांश हिशेब तक्त्यानुसार (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी तक्रार नमूद केली असून याबाबत फेब्रुवारी २०१५ ते जून २०१९ पर्यंतच्या कालावधीमधील रक्कमेच्या मागणीचा तपशिल दिला आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये महाविद्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या वेगवेगळया समित्या कार्यरत आहेत. संस्थेच्या मालकीच्या इमारतीसंदर्भात एक समिती आहे. (इस्टेट/बिल्डींग मेंटनन्स कमिटी) त्या समितीचे कामकाज पाहण्यासाठी नेमणूक केली होते. त्यानुसार त्यांनी महाविद्यालयाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या इमारतींची देखभाल करणेचे होते व त्यांनी त्याचे कोणतेही काम केलेले नाही. सदरचे कामकाज हे त्यांच्या कामाचा एक भाग असून त्यांना निर्देशित वेळेतच करणेचे आहे व त्यांनी ते काम केलेले नाही व त्यांनी केलेली मागणी ही चूकीची आहे. सदरचा मुद्दा हा तक्रारदारयांनी दि. ०४/०५/२०१५ रोजी तक्रार अर्ज शिवाजी विद्यापीठामध्ये दिलेला होता.

यामध्ये शिवाजी विद्यापीठ तक्रार समितीने सदरचा मुद्दा दि.२३/०८/२०२२ रोजीच्या निकालानुसार अमान्य केलेला असल्याचे नमूद केले आहे. तसेच याबाबत तक्रारदार यांनी सदर आदेशाविरूध्द मे. न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे दाद मागितली असून ती प्रलंबित असल्याचे समितीसमोर कथन केले.

उपरोक्त तक्रारीबाबत समितीच्या असे निदर्शनास येते की, सदरची तक्रार मे.न्यायाधिकरण यांचेसमोर प्रलंबित आहे. तथापि, याबाबत तक्रारदार यांनी आपण समितीकडे यापुर्वी दाखल केलेल्या तक्रारीतील मागणी ही सन २०१५ पुर्वीची केलेली होती. आता सदर अर्जात फेब्रुवारी, २०१५ पासून पुढील कालावधीकरीताची आपण मागणी नमूद केली असल्याने ती समितीसमोर मांडली आहे असे कथन केले. समितीने दोन्ही पक्षकारांनी या तक्रारीबाबत मांडलेले लेखी व तोंडी म्हणणे अवलोकनी घेतले. तक्रारदार यांच्या दि.०४/०५/२०१५ रोजीच्या अर्जामध्ये जो मागील कालावधीचा मुद्या होता. त्याबाबत मे.न्यायाधिकरण यांचसमोर तक्रार प्रलंबित असून मे.न्यायाधिकरण यांचेकडून त्याबाबत अंतिम निर्णय झाल्याशिवाय हया मुद्याबाबत सद्यस्थितीत तक्रार निवारण समितीकडून निर्णय देणे उचित होणार नाही.

**११) फेब्रुवारी - २०१५ ते डिसेंबर - २०१५ या कालावधीतील शासन नियमानुसार होणाऱ्या महागाई भत्याची थकीत रक्कम -**

तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये फेब्रुवारी २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीतील शासन नियमानुसार होणा-या महागाई भत्याची रक्कम येणे आहे. ही रक्कम अधिक या रकमेची, दि.३०/०९/२०२४ पर्यंतची १२ टक्के प्रतीवर्षे व्याजदराने होणारी व्याजाची रक्कम त्यांनी सादर केलेल्या सारांश हिशेब तक्त्यानुसार (Abstract chart of calculation) प्रमाणे मिळावी अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये आमचे महाविद्यालय हे पूर्णतः विनाअनुदानित तत्वावर सुरू असून विद्यार्थ्यांकडून जमा होणाऱ्या फी मधून स्टाफच्या पगारावर खर्च केले जातो. सर्व स्टाफना ज्या ज्या वेळी पगारवाढ व महागाई भत्ता लागू करण्यात आला त्याबरोबरच तक्रारदारयांनाही लागू केलेला आहे. त्यामुळे त्यांना महागाई भत्यातील फरक आम्ही देणे लागत नाही. सदरचा मुद्दा हा तक्रारदारयांनी दि.०४/०५/२०१५ रोजी तक्रार अर्ज शिवाजी विद्यापीठामध्ये दिलेला होता. यामध्ये शिवाजी विद्यापीठ तक्रार समितीने सदरचा मुद्दा दि. २३/०८/२०२२ रोजीच्या निकालानुसार अमान्य केलेला आहे असे नमूद केले आहे. तसेच याबाबत तक्रारदार यांनी सदर आदेशाविरूध्द मे.न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे दाद मागितली असून ती प्रलंबित असल्याचे समितीसमोर कथन केले.

उपरोक्त तक्रारीबाबत समितीच्या असे निदर्शनास येते की, सदरची तक्रार मे.न्यायाधिकरण यांचेसमोर प्रलंबित आहे. तथापि, याबाबत तक्रारदार यांनी आपण समितीकडे यापुर्वी दाखल केलेल्या तक्रारीतील मागणी ही सन २०१५ पुर्वीची केलेली होती. आता सदर अर्जात फेब्रुवारी, २०१५ पासून

पुढील कालावधीकरीताची मागणी नमूद केली असल्याने ती समितीसमोर मांडली आहे असे कथन केले. समितीने दोन्ही पक्षकारांनी या तक्रारीबाबत मांडलेले लेखी व तोंडी म्हणणे अवलोकनी घेतले. तक्रारदार यांच्या दि.०४/०५/२०१५ रोजीच्या अर्जामध्ये जो मागील कालावधीचा मुद्दा होता. त्याबाबत मे.न्यायाधिकरण यांचसमोर तक्रार प्रलंबित असून मे.न्यायाधिकरण यांचेकडून त्याबाबत अंतिम निर्णय झाल्याशिवाय हया मुद्याबाबत सद्यस्थितीत तक्रार निवारण समितीकडून निर्णय देणे उचित होणार नाही.

तसेच तक्रारदार यांनी वरील तक्रार अर्जात वरील मुद्दा क्रं.१ ते ११ या तक्रारीबाबत संस्थेकडून दि.३०/०९/२०२४ अखेर रितसर येणे असलेली एकूण रक्कम रूपये २,२५,९८,६४१/- (दोन कोटी पंचवीस लाख अठठयान्नव हजार सहाशे एक्केचाळीस) इतकी होत आहे. ही रक्कम त्यांना येत्या आठ दिवसात मिळावी अशी रितसर मागणी विनंती त्यांनी संस्थेचे मा.प्राचार्य यांना ई-मेल पत्रव्यवहाराव्दारे, दि.०३/१०/२०२४ रोजी केलेली आहे. परंतू असा पत्रव्यवहार करूनही मा.प्राचार्यांनी त्यांना येणे असलेली रक्कम देणेबाबत योग्य ती कोणतीही उचित कार्यवाही केलेली नाही. त्यांच्या मागणी विनंतीस अजिबात कोणताही व कसलाच सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही. त्यांनी रितसर मागणी केलेली रक्कम दिलेली नाही. तरी संस्थेच्या मा.प्राचार्यांकडून त्यांना येणे असलेली सदर रक्कम रू.२,२५,९८,६४१/- (दोन कोटी पंचवीस लाख अठठयान्नव हजार सहाशे एक्केचाळीस) इतकी लवकरात लवकर देणेबाबत योग्य असे आदेश तक्रार निवारण समिती या न्याय व्यवस्थेमार्फत संस्थेच्या मा.प्राचार्य यांना व्हावेत व त्यांना योग्य असा न्याय मिळावा तसेच या प्रक्रियेत मी तक्रारदार (वादी) एक सामान्य कर्मचारी आहे आणि प्रतिवादी हे एक प्रबळ पदाधिकारी आहेत. त्यामुळे माझ्या सदर/उपरोक्त तक्रार निवारणाबाबतच्या या न्याय प्रक्रियेदरम्यान एखाद्या वा काही मुद्यांविषयी शंकेची स्थिती उदभवल्यास, शंकेचा अनुकूल फायदा मला मिळावा अशी विनंती नमूद केली आहे.

उपरोक्त प्रमाणे तक्रारदार यांच्या मुद्दा क्र. १ ते ११ या मागणीचा समितीने विचार करून ते कारणांसहित निर्णयित केले आहेत. सबब तक्रारदार मागणी करतात अशा रकमेचे त्यांना येणे असल्याचे त्यांनी पुराव्यासह शाबित केलेले नाही. त्यामुळे त्यांच्या या रक्कम मागणीमध्ये तथ्य दिसून येत नाही.

**१.सर्व्हिस रेकॉर्ड दुरूस्ती तपशिल.**

तक्रारदार यांनी सदर तक्रारीमध्ये - दि.३१/१२/२००८ पर्यंत तक्रारदार हे मेंटेनन्स इंजिनियर या नॉन-टिचिंग पदावर काम करत होते. त्या सेवा कालावधीत त्यांच्या सेवा पुस्तिकेत हक्काच्या रजेची नोंद होत होती. ही नोंद अद्यावत केलेली नाही. तरी ही नोंद अद्यावत करून सेवा पुस्तिकेची एक प्रत मिळावी, अशी तक्रार नमूद केलेली आहे.

याबाबत जाबदार यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये तक्रादारयांचे सेवापुस्तकामध्ये केलेल्या नोंदी बरोबर व अद्यावत आहेत. त्यांनी विद्यापीठाच्या दप्तरी सर्व्हीस रेकॉर्डमधील दुरूस्ती केलेली मागणी पूर्णपणे

चुकीची आहे. त्यांच्या सेवापुस्तकामध्ये हक्काच्या रजा ज्या त्या वेळी जमा दाखविलेल्या आहेत. त्यांनी त्यांच्या स्वतःचे हस्ताक्षराने हक्काचे रजा अर्ज भरून दिले होते. प्राचार्यांनी/कार्यालयाने परस्पर या रजा अर्जात कोणतीही खाडाखोड केलेली नाही. तक्रादारहे दि. ०१/०/१९९५ पासून दि. ३१/०७/२००८ अखेर मेंटनन्स इंजिनीअर या पदावर आणि दि.०१/०८/२००८ पासून आजअखेर सहायक प्राध्यापक पदावर सेवेत आहेत. त्यांचे प्राचार्य व संस्था व्यवस्थापनाने, शिवाजी विद्यापीठ संस्थेतील दप्तरी (रेकॉर्डला) १९ वर्षाचा संपूर्ण अनुभव मुद्दामहून काढून टाकला/शुन्य केला हे म्हणणे पूर्णपणे चुकीचे व खोडसाळपणाचे आहे. त्यांचा हा अनुभव आमचे दप्तरी नोंद आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने समितीने जाबदार यांना तक्रारदार यांच्या सेवापुस्तकाची अद्ययावत केलेली झेरॉक्स प्रत समितीकडे दाखल करण्याची सूचना केली होती. त्यानुसार जाबदार यांनी दि.१९ जून २०२५ रोजी तक्रार निवारण कक्षाकडे सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. सेवापुस्तकाची प्रत तपासली असता त्यामध्ये तक्रारदार यांच्या तक्रारीत नमूद सेवा कालावधीतील हक्काच्या रजेच्या नोंदी घेण्यात आलेल्या असल्याचे दिसून येते. सबब, सदर तक्रार मुद्या निकाली काढणेत येत असून जाबदार यांनी अद्ययावत नोंदीसह सेवापुस्तकाची एक प्रत तक्रारदार यांना उपलब्ध करून देणे आवश्यक असे या समितीचे मत.

**२.मानसिक त्रासाची आर्थिक भरपाई तपशिल.**

तक्रारदार यांनी सदर तक्रारीमध्ये पुढीलप्रमाणे तक्रार नमूद केली आहे - या संस्थेतील सेवाकाळात माझ्यावर अनेक बाबतीत वारंवार अन्याय झालेने मला अतोनात मानसिक त्रास मला सहन करावा लागला व लागत आहे. विशेषकरून, संपूर्ण जगावर कोरोना महामारीचे भंयकर संकट होते. अक्षरशः मृत्यूचे थैमान सुरू होते. त्या कालावधीत अशा आणिबाणीच्या परिस्थितीत माझा नियमित पगार थांबवून ठेवला. त्यामुळे मला जबर मानसिक त्रास सहन करावा लागला. मला झालेल्या या मानसिक त्रासाच्या भरपाईपोटी, दि.३०/०९/२०२४ पर्यंतची योग्य अशी आर्थिक भरपाई रक्कम मला मिळावी, ही विनंती.

याबाबत जाबदार यांच्या खुलाश्यामध्ये तक्रारदार यांचेबाबतीत प्रत्येक वेळी सहानुभूतीने विचार करून त्यांना संस्थेत योग्य ती संधी उपलब्ध करून दिल्याचे दिसत आहे. अशावेळी अत्यंत चुकीच्या पध्दतीने विपर्यास्त मागणी करून संस्थेस वेठीस धरणे, संस्थेच्या अपेक्स बॉडीकडे संस्थेची बदनामी करणे अशा प्रकारामुळे त्यांची प्रवृत्ती दिसून येत आहे. श्री. गजानन निवृत्ती कानडे यांनी १९९५ पासून सन २००८ पर्यंतच्या शिक्षकेत्तर पदावरील कालावधीतील वेगवेगळया प्रकारे केलेली कालबाहय व अवास्तव मागणी चूकीची असलेने संस्था त्यांना देय लागत नाही. शिक्षकीय पदावर काम करीत असताना

माहे जानेवारी २००९ पासून त्यांचेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय अथवा आर्थिक नुकसान झालेले दिसून येत नाही. त्यांनी केलेली ही शैक्षणिक कामाचाच भाग असल्याचे नमूद केले आहे.

याबाबत श्री.कानडे यांच्या तक्रारी व संस्था, महाविद्यालयाने मांडलेले म्हणणे विचारात घेता श्री.कानडे यांनी मानसिक त्रासाबाबत कोणताही पुरावा समितीसमोर सादर केलेला नाही. सबब या तक्रारीमध्ये तथ्य दिसून येत नाही.

## आदेश

तक्रार अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

१. तक्रारदार यांनी अर्जात नमूद केलेल्या मागणी क्र. १ व ३ ते ११ अमान्य करण्यात येत आहेत.

२. तक्रारदार यांनी अर्जात नमूद केलेली मागणी क्र. २ मान्य करण्यात येत आहे. जाबदार यांनी तक्रारदार यांच्या सन २०१७ व २०१८ मधील कालावधीत रोखलेल्या वेतनवाढी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून दोन महिन्याच्या आत तक्रारदार यांना आदा कराव्या.

३. जाबदार यांनी तक्रारदार यांचे सेवापुस्तक अद्यायावत करून त्याची प्रत तक्रारदार यांना त्वरीत उपलब्ध करून द्यावी.

(झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.)

दिनांक : 4 AUG 2025

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)